| ACA – R - 16 | यशशारदा वार्षिक संमेलना निमित्त पुष्प रचना स्पर्धेचे आयोजन | Academic Year: 2019-20 |
|---|---|---|
| Rev : 00 | | Annual/Semester: I / II |
| Date: 15.06.2018 | | |

Ref: MES/ACSC/ACA/ / Date: 11/02/2020

Place: Seminar Hall

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये यशशारदा वार्षिक स्नेह संमेलन अंतर्गत विविध नाविण्य पूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून मंगळवार दिनांक ११/०२/२०२० रोजी पुष्प रचना स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फुले व पानांच्या मदतीने विविध सामाजिक प्रश्नांना स्पर्श करणार्या रांगोळ्या रेखाटल्या. त्या मध्ये प्रामुख्याने बेटी बचाओ बेटी पढाओ , वंदे मातरम, हम सब एक है, राष्ट्रीय पक्षी मोर, नारी शक्ति, धूम्रपान, तिरंगा, कलश पुजा, सौभाग्यवती भव, या संकल्पनांचा सामावेश होता.

रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध रासायनिक अभिक्रिया तसेच मानवी आहारा मध्ये विविध पाले भाज्या , फळ भाज्याचे महत्व दर्शवणार्या रांगोळ्या रेखाटल्या या रांगोळ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतेले. वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ, फुलदाणी, हार , गजरा , वेणी , यांचे विविध प्रकार प्रदर्शनातून दर्शविले. या शिवाय फुलांच्या मदतीने रंगमंच सजावटी तसेच पुष्परचना केल्या. यामध्ये विविध रंगी बेरंगी पाने फुले वेली यांचा कल्पकतेने वापर केला. विद्यार्थ्यांनी तयार केलेली मनमोहक छोटे पुष्पगुच्छ, विविध प्रकारच्या फुलदान्या या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरले. पुष्परचना स्पर्धे मध्ये एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. पुष्परचना स्पर्धेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब शिरसाठ डॉ. रजनी शिरसाठ यांच्या हस्ते पार पडले. परीक्षक म्हणून पुष्प सजावट व्यावसायिक श्री.स्वप्नील कदम यांनी काम पाहिले. या कार्यक्रमात फुलांचे प्रदर्शन स्पर्धेमध्ये कु.पूनम डमाळे व कु.पुजा सोनवणे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. संकल्पना आधारित पुष्प रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.रुद्रा गडाख हिने मिळवला . रचना पुष्प रांगोळी स्पर्धेमध्ये बी. बी. ए.व बी. बी. ए.(सी.ए.) च्या विद्यार्थीनींनी प्रथम क्रमांक

मिळवला. पुष्पगुच्छ व हार तयार करणे या स्पर्धेमध्ये कु. अश्विनी गिरगुणे हिने प्रथम क्रमांक मिळवला. फुलदाणी सजावट स्पर्धेमध्ये अमोल लिपने याने प्रथम क्रमांक मिळवला. प्रयोगशाळा सजावट स्पर्धेमध्ये रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी रंगमंच सजावट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. स्पर्धेमध्ये प्रावीण्य मिळवणार्या स्पर्धकांना स्वप्नील कदम , प्राचार्य डॉ. शंकर लावरे , उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर ,शैक्षणिक प्रमुख डॉ.ज्ञानदेव झिने यांच्या हस्ते परितोषिक वितरण करण्यात आले.सादर कार्यक्रमासाठी वाणिज्य शाखा प्रमुख डॉ.भानुदास चोपडे,कला शाखा प्रमुख डॉ.माछिंद्र वर्पे आणि विज्ञान शाखा प्रमुख प्रा.वसंत फाटके उपस्थित होते. पुष्प रचना स्पर्धेचे चे समन्वयक प्रा.बाळासाहेब खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.ज्ञानेश्वर तुवर , प्रा.अश्विनी खोसे , प्रा.मीनाक्षी वाबळे ,प्रा.सुवर्णा ससे,प्रा.शाहनज देशमुख व प्रा.गणेश निकम यांनी कमिटीचे काम पाहिले.परितोषिक वितरणाचे सूत्रसंचालन डॉ.विठ्ठलराव दरंदले यांनी केले.व कार्यक्रमाच्या शेवटी वृक्षारोपण करण्यात आले.




